महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ व त्यांच्या सभासद असलेल्या संस्थांच्या बळकटीकरणासाठी अटल महापणन विकास अभियान राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:- संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२७३/२४-स
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : २६ डिसेंबर, २०१७.

<u>संदर्भ</u>:-१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग
क्रमांक : शिकाना-१२१६/प्र.क्र. १०/२४-स, दिनांक २० डिसेंबर, २०१६
२) शासन परिपत्रक,सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग,
क्रमांक: शिकाना-१२१६/प्र.क्र. १०/२४-स, दिनांक ३० डिसेंबर, २०१६
३) शासन परिपत्रक,सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग
क्रमांक: शिकाना-१२१६/प्र.क्र. १०/२४-स, दिनांक १२ एप्रिल, २०१७
४) शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग,
क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र. २२८/२४-स, दिनांक ८ डिसेंबर, २०१७

<u>प्रस्तावना</u> :-

राज्यातील सहकारी पणन संस्था व प्रक्रिया संस्था यांची शिखर संस्था म्हणुन महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई काम करत आहे. राज्य पणन महासंघ, त्यांच्या सभासद संस्था म्हणजे खरेदी-विक्री संघ व विविध कार्यकारी सहकारी (वि.का.स.) सोसायटी यांचे कामात सुधारणा करुन त्यांचे बळकटीकरण करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २०/१२/२०१६ अन्वये अटल महापणन विकास अभियान दिनांक २५/१२/२०१६ ते दिनांक १/७/२०१७ या कालावधीत राबविण्यात आलेले आहे. सदर अभियान सन २०१७-१८ या वर्षात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्य सहकारी पणन महासंघ व त्यांच्या सभासद असलेल्या संस्थांच्या बळकटीकरणासाठी दिनांक २५.१२.२०१७ ते १.०७.२०१८ या कालावधीमध्ये **अटल महापणन विकास अभियान** राबविण्याचा निर्णय याव्दारे घेण्यात येत आहे. यामध्ये राज्य सहकारी पणन महासंघ, खरेदी विक्री संघ, वि.का.स. संस्था यांचे सक्षमीकरणाबरोबर या सहकारी पणन व्यवस्थेशी राज्यातील शेतकरी उत्पादक संस्था व महिला स्वयंसहाय्यता गट यांना जोडून त्यांचेही सक्षमीकरण अपेक्षित आहे.

१.अभियानाचे उद्देश:

A. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, खरेदी विक्री संघ, सहकारी प्रक्रिया संस्था व वि.का.स. सोसायटी यांना बळकट करणे.
B. पणनच्या या त्रिस्तरीय रचनेच्या बळकटीकरणातून राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पणन विषयक सुविधा देऊन संस्थांची आर्थिक उलाढाल वाढवणे.
C. या कामी समाजातील प्रत्येक घटक जसे, शासकीय संस्था, सहकारी संस्था,खाजगी संस्था व सभासद शेतकरी/जनता यांचा सहभाग घेणे.

D. याबाबत जनजागृतीच्या माध्यमातून सहकारी पणन विकासासाठी चळवळ उभी करणे.

२. उपरोक्त उदिष्टे साध्य करण्यासाठी राबविण्याचे उपक्रम:

a. गावातील १०० % शेतकऱ्यांना विविध कार्यकारी सेवा सहकारी (वि.का.स.) सोसायटीचा सभासद करुन घेणे.

b. तालुक्यातील वि.का.स. सोसायटीला तालुका खरेदी विक्री संघाचा सभासद करुन घेणे.

c. राज्यातील प्रत्येक खरेदी विक्री संघ व प्रक्रिया संस्था पणन महासंघाची सभासद असणे आणि पणन महासंघाचे सर्व उपक्रम खरेदी-विक्री संघाव्दारे तर खरेदी-विक्री संघाचे सर्व उपक्रम वि.का.स. सोसायटीव्दारे राबविणे.

d. नियमाप्रमाणे या संस्थांनी स्वत:च्या स्थावर-जंगम मालमत्तांचा व्यावसायिक उपयोग करणे, इतरांकडे असणाऱ्या त्यांच्या थकीत रकमांची वसुली करणे, पणन महासंघ व इतर संस्थांची गोदामे याचा वापर पुर्ण क्षमतेने करणे,शेतमाल तारण योजनेत सहभागी होणे, इत्यादीच्या माध्यमातुन स्वत:चे खेळते भांडवल उभे करणे, व आर्थिक स्थिती सुधारणे.

e. पणन महासंघाने या संस्थांच्या माध्यमातून व कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या सहकार्याने किमान आधारभूत योजने अंतर्गत अन्नधान्य खरेदी गतीमान करणे.

f. पणन महासंघाने त्यांच्या स्वत:च्या खत कारखान्याच्या भगिरथ खतांचे व पशुखाद्य कारखान्यांच्या वैभव पशुखाद्यांचे उत्पादन वाढवून या सभासद संस्थांच्या माध्यमातून विक्री वाढविणे.

g. या संस्थांनी शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या कृषी निविष्ठा जसे की, रासायनिक खते, जैविक खते, सेंद्रिय खते, बुरशीनाशके, तृणनाशके, किटकनाशक, बियाणे, कृषी अवजारे, इत्यादींची खरेदी-विक्री वाढविणे.

h. या संस्थांनी शासनाच्या इतर योजना जसे रेशन दुकान, व्दारपोच धान्य, अंगणवाडी-प्राथमिक शाळा-आश्रमशाळा यांना पोषण आहार पुरवठा, इत्यादीमध्ये सक्रिय सहभाग घेऊन उत्पन्न वाढविणे.

i. कृषी मालाची खरेदी करुन स्वच्छता, प्रतवारी करुन त्याचे पॅकेजींग, लेबलींग, ब्रॅडींग करुन विक्री करणे, तसेच गरजेप्रमाणे जीवनावश्यक वस्तू खरेदी-विक्री वा इतर कोणत्याही तत्सम क्षेत्रात उतरुन संस्थांची आर्थिक उलाढाल वाढविणे.

j. शेतकरी उत्पादक संस्था व सहकाराचे छोटे रुप असणाऱ्या महिला स्वयंसहाय्यता गटांची (बचत गटांची) उत्पादने व सेवांची विक्री सहकारी पणन संस्थाद्वारे शहरी भागातील गृह निर्माण संस्थांना करुन त्यांना सहकारी पणन व्यवस्थेशी जोडणे.

३. अभियान राबविण्याची कार्य पध्दती :-

सदर अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी व तळागाळापर्यंत पोहचण्यासाठी पुढील कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

सन २०१६-१७ च्या अटल महापणन विकास अभियानाच्या माध्यमातून ५०० पेक्षा जास्त सहकारी पणन संस्थांनी (खरेदी-विक्री संघ व वि.का.स. संस्था) स्वबळावर नवीन व्यवसाय सुरु केले असून, या पध्दतीने किमान ५००० वि.का.स. संस्थांचे नवीन व्यवसाय सुरु करुन सक्षमीकरण करण्याचे मा.मुख्यमंत्री महोदय यांनी सुचित केले आहे.

यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यातून किमान १०-१५ सहकारी पणन संस्थांची निवड करणे, त्यांचे व्यवसाय विकास आराखडे (Business Development Plans - BDP) तयार करणे, या संस्थांना सक्षम करण्यासाठी भागीदार संस्था जसे, नाबार्ड, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा ध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, पतसंस्था, स्वयंसेवी संस्था, कॉर्पोरेट संस्था इ. ची निवड करणे, या संस्थांबरोबर सहकारी पणन संस्थांचे करार (MOU) करणे व प्रत्यक्षात नवीन व्यवसाय सुरु करणे अशा पध्दतीने काम करता येईल.

४. **क्षमता बांधणी :-**
सदर अभियान राबविणाऱ्या संबंधित सर्वांची जसे-पदाधिकारी,अधिकारी,कर्मचारी इ. ची क्षमता बांधणी करण्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळा, बैठका राज्य स्तरावरुन विभाग स्तर, जिल्हास्तर,तालुकास्तर, गाव स्तरापर्यंत आयोजित करणे आवश्यक राहील. तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांना क्षेत्रीय भेटी आयोजित करुन काही नाविन्यपूर्ण संकल्पनांचा स्विकार व विस्तार करता येईल.

५. **माहिती,शिक्षण व संवाद :** सदर अभियानाबाबत राज्य स्तरापासून गाव स्तरापर्यंत प्रचार प्रसिध्दीचे विविध मार्गाचा अवलंब जसे अभियानासंबंधी माहिती देणारे बॅनर्स, पोस्टर्स, पॅम्पलेटस, रेडीओ, टि.व्ही.वर कार्यक्रम व जाहिराती इ. चा वापर करणे आवश्यक राहील.

६. **अभियानाची अंमलबजावणी :** अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी पणन महासंघाच्या राज्यस्तरीय अधिकारी,जिल्हा विपणन अधिकारी, जिल्हा उपनिबंधक, तालुका सहाय्यक निबंधक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सहकारी पणन संस्थांचा या अभियानात सक्रीय सहभाग करुन घेण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक राहील. अभियान अंमलबजावणीचा कार्यक्रम पुढील प्रमाणे राहील.

७. **दिनांक २५ डिसेंबर,२०१७ ते १ जुलै,२०१८ चा अभियान कार्यक्रम**

i. **<u>राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा:-</u>** अभियानाचा शुभारंभ राज्यस्तरीय कार्यशाळेव्दारे मा. मंत्री, (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) आणि मा. राज्यमंत्री (पणन) यांचे शुभहस्ते व प्रधान सचिव (पणन), व्यवस्थापकीय संचालक (पणन महासंघ), सहकार आयुक्त, पणन संचालक, पुणे व अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांचे उपस्थितीत करणेत येईल. या कार्यशाळेसाठी पणन महासंघाचे राज्यस्तरीय अधिकारी, सर्व विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विपणन अधिकारी,तालुका सहायक निबंधक, नाबार्ड प्रतिनिधी, बियाणे महामंडळ प्रतिनिधी, इफको, कृभको, राष्ट्रीय केमिकल फर्टीलायझर, दिपक, झुआरी इ. खत कंपन्यांचे प्रतिनिधी, इतर भागीदार संस्था, प्रशिक्षण संस्थांचे प्रतिनिधी व उत्कृष्ट काम असणाऱ्या संस्थांचे पदाधिकारी यांना निमंत्रीत करण्यात यावे. या कार्यशाळेमध्ये अभियान सादरीकरणानंतर संबंधितांच्या कार्यास चालना देण्यासाठी (Motivation) व्याख्यात्यास बोलविण्यात यावे.

ii. **<u>विभागीय कार्यशाळा</u>** :- राज्यातील प्रत्येक विभागामध्ये विभागीय कार्यशाळांचे आयोजन संबंधित विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली करण्यात यावे. या कार्यशाळांमध्ये विभागातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, विभागीय अंमलबजावणी व संनियंत्रण समितीचे सदस्य, जिल्हा उपनिबंधक, तालुका सहाय्यक /

उपनिबंधक, जिल्हा पणन अधिकारी, निवडलेल्या सहकारी पणन संस्थांचे (खरेदी-विक्री संघ) अध्यक्ष व सचिव, भागीदार संस्थांचे प्रतिनिधी इ. ना आमंत्रित करण्यात यावे. या कार्यशाळांचे आयोजन करण्याची, मार्गदर्शनाची जबाबदारी संबंधित विभागीय सहनिबंधक यांची राहील. या कार्यशाळेमध्ये अभियान सादरीकरणानंतर संबंधितांच्या कार्यास चालना देण्यासाठी (Motivation) व्याख्यात्यास बोलविण्यात यावे

iii. **<u>जिल्हास्तरीय कार्यशाळा :-</u>** प्रत्येक जिल्हयामध्ये संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे. या कार्यशाळांमध्ये जिल्हा अंमलबजावणी समितीचे सदस्य, जिल्हयातील सर्व तालुक्यांचे सहाय्यक निबंधक, तालुका खरेदी विक्री संघाचे पदाधिकारी जसे, अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक, विभागप्रमुख, उत्पादक (खते,बियाणे) इ. चे प्रतिनिधी, निवडलेल्या वि.का.स. संस्थांचे अध्यक्ष व सचिव, इतर भागीदार संस्था यांना निमंत्रित करण्यात यावे. सदर कार्यशाळांचे आयोजन करण्याची, मार्गदर्शनाची संयुक्तरित्या जबाबदारी जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विपणन अधिकारी यांची राहील. या कार्यशाळांमध्ये अभियान सादरीकरणानंतर संबंधितांच्या Motivation साठी व्याख्यान देण्यासाठी व्याख्यात्यास बोलविण्यात यावे.

iv. **<u>तालुकास्तरीय कार्यशाळा :-</u>** प्रत्येक तालुक्यामध्ये किंवा शेजारच्या दोन तालुक्यांच्या एकत्रित तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे. या कार्यशाळेमध्ये तालुक्यातील ५००० वि.का.स. संस्था सक्षमीकरण कार्यक्रमात निवडलेल्या विविध कार्यकारी सहकारी (वि.का.स.) सोसायटीचे अध्यक्ष, गटसचिव, स्वयंसहाय्यता गटाचे प्रतिनिधी, शेतकरी उत्पादक संस्था प्रतिनिधी, इतर भागीदार संस्था यांना निमंत्रित करण्यात यावे. सदर कार्यशाळा आयोजनाची व मार्गदर्शनाची जबाबदारी तालुका सहाय्यक निबंधक व जिल्हा विपणन अधिकारी यांची राहील. या कार्यशाळांमध्ये अभियान सादरीकरणानंतर संबंधितांच्या कार्यास चालना देण्यासाठी व्याख्यात्यास बोलविण्यात यावे.

तालुका कार्यशाळा संपन्न झाल्यानंतर त्वरीत अभियानातील सर्व उपक्रमांची अंमलबजावणी तालुक्यात व गावात सुरु करण्यात यावी. यासाठी गावागावात विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था स्तरावर शेतकऱ्यांच्या बैठका आयोजित करुन त्यांना सहभागी करुन घ्यावे. सदर उपक्रमाची अंमलबजावणी १ जुलै, २०१८ पर्यंत गतिमान पध्दतीने करण्यात यावी.

८. **अभियानाचे संनियंत्रण :-** या अभियानाची अंमलबजावणी तालुकास्तरावर सहायक निबंधक, जिल्हा स्तरावर जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विपणन अधिकारी, विभाग स्तरावर विभागीय सहनिबंधक व राज्य स्तरावर व्यवस्थापकीय संचालक, पणन महासंघ, सहकार आयुक्त व पणन संचालक, पुणे हे करतील. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासन निर्णय, दिनांक ८/१२/२०१७ अन्वये सहकार आयुक्त, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समन्वय व संनियंत्रण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यांनी या कामी वेळोवेळी बैठकांचे आयोजन करावे, सदर उपक्रमाची अंमलबजावणी गतिमान पध्दतीने करण्यात यावी.

९. **अभियानाचे मुल्यमापन** :- अभियानातील उपक्रमांचे व कामांचे विभागनिहाय, जिल्हानिहाय, तालुकानिहाय, संस्थानिहाय व अधिकारीनिहाय मुल्यमापन समन्वय व संनियंत्रण समित्यांद्वारे करण्यात येईल.

१०. **स्पर्धा व पुरस्कार** :-_या अभियानामध्ये निवडलेल्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, खरेदी विक्री संघ, सहकारी प्रक्रिया संस्था व पणन महासंघाचे विभागप्रमुख यांचा सहभाग अपेक्षित असुन नाविण्यपुर्ण कामे करणाऱ्या व उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थाना, अधिकाऱ्यांना मुल्यमापनाव्दारे स्पर्धात्मक पुरस्कार देण्यात येतील.

११. अभियानाचे संपुर्ण नियोजन, कार्यक्रमाचे वेळेवर आयोजन करणे,कार्यक्रम देखरेख बिले व कार्यक्रम पुर्ण झाल्यानंतर त्यांचा शासनास अहवाल सादर करणे याची जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था व पणन संचालक, पुणे यांची राहील.

१२. अभियानात राबवायचे उपक्रम व त्यासाठी लागणारा आवश्यक निधी याबाबतचा तक्ता सोबतच्या **परिशिष्ट 'अ'** मध्ये जोडला आहे. या अभियानासाठी होणारा खर्च महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांनी ५० : ५० टक्के या प्रमाणात करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२२९१३१८३२२१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने.

Valvi Kalu Gonya

Digitally signed by Valvi Kalu Gonya
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Op,Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, cn=Valvi Kalu Gonya
Date: 2017.12.29 13:23:33 +05'30'

(का. गो. वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. सर्व मा.मंत्री, मंत्रालय, मुंबई,
५. सर्व मा.राज्यमंत्री मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. राज्यमंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१०.अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,

११.अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. प्रधान सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३.सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४.सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन मंहासंघ, मुंबई
१७.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती मिशन, नवी मुंबई
१८.व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई.
१९ व्यवस्थापकीय संचालक, विदर्भ सहकारी पणन महासंघ, नागपूर
२० सर्व विभागीय आयुक्त
२१ सर्व जिल्हाधिकारी
२२ सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
२३ पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२४ कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
२५ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई
२६ सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
२७ सर्व विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था
२८ सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
२९ सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
३० सर्व जिल्हा समन्वयक, महिला आर्थिक विकास महामंडळ
३१ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ
३२ सर्व जिल्हा पणन अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन मंहासंघ, मुंबई
३३ सर्व जिल्हा पणन अधिकारी, विदर्भ सहकारी पणन मंहासंघ, नागपूर
३४ महालेखापाल - १/२, (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
३५ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३६ निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
३७ निवडनस्ती.

परिशिष्ट 'अ'

शासन निर्णय, क्रमांक:- संकीर्ण-२०१७/प्र.क्र. २७३/२४स, दिनांक २६ डिसेंबर, २०१७
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन

अटल महापणन विकास अभियान (सन २०१७-१८)

अभियान अंमलबजावणी करिता राबविण्याचे उपक्रम व निधीची आवश्यकता

१. **क्षमता बांधणी (Capacity Building) कार्यशाळा:-**

अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, जिल्हा/तालुका खरेदी-विक्री संघ व गाव विविध कार्यकारी सहकारी (वि.का.स.) सोसायटी यांचे पदाधिकारी, अधिकारी/कर्मचारी व इतर संबधीत अधिकारी जसे- विभागीय सह निबंधक, जिल्हा उप निबंधक, तालुका सहाय्यक निबंधक इत्यादी यांच्या क्षमता बांधणीसाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करावयाचे आहे. या कार्यशाळांमध्ये अभियानाबाबतचे सादरीकरण (Power Point Presentation) झाल्यानंतर Positive Attitude, Team Building and Motivation या विषयांवर प्रथितयश व्याख्यात्यांचे व्याख्यान आयोजित करावेत.

स्तर	कार्यशाळा संख्या	आवश्यक निधी
राज्यस्तर	१	रु.१.०० लाख
विभागस्तर	६	रु.२०,०००/- (कार्यशाळा आयोजन- रु.१५०००/- + व्याखाते मानधन- रु.५,०००/-)x ६ विभाग = रु.१.२० लाख
जिल्हास्तर	३४	रु.२०,०००/- (कार्यशाळा आयोजन- रु.१५०००/- + व्याखाते मानधन- रु.५,०००/-)x ३४ जिल्हे = रु. ६.८०लाख
तालुकास्तर (२ तालुक्यांच्या एकत्रित)	१७६	रु.१०,०००/- (कार्यशाळा आयोजन- रु.५०००/- + व्याखाते मानधन- रु.५,०००/-x ३५० तालुके = रु.१७.६० लाख
एकुण	**२१७**	**रु. २५.६० लाख**

२. **अभियानाचा प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती, शिक्षण व संवाद (IEC) उपक्रम**:

अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनजागृती अत्यंत आवश्यक आहे. यासाठी जिल्हा, तालुका व गावस्तरावर बॅनर व पोस्टर लावणे आवश्यक राहील. याबरोबरच रेडीओ, टि.व्ही.या माध्यमांद्वारे जाहिरात, मुलाखत इत्यादि उपक्रम राबविण्यात यावेत.

उपक्रम	संख्या	आवश्यक निधी
होर्डिंग/बॅनर प्रिंटींग (४ फुट x ६ फुट)	२२,०००	रु.२००/- प्रति बॅनर x २२,०००= ४४.०० लाख
पोस्टर प्रिंटींग (१२ इंच x १८इंच)	४४,०००	रु.१०/- प्रति पोस्टर x ४४,०००= ४.४० लाख
ब्राउशर/माहिती पत्रिका डिझायनिंग व प्रिंटींग	१०,०००	अंदाजे रू. १.०० लाख
यशोगाथा बुकलेट डिझायनिंग व प्रिंटींग	२,०००	अंदाजे रू. १.०० लाख
यशोगाथा फिल्म निर्मिती	२	रू. २.०० लाख
टि.व्ही.स्पॉट निर्मिती व प्रसारण	२	रू. १०.०० लाख
रेडीओ जिंगल निर्मिती व प्रसारण	२	रू. २.०० लाख
एकुण		**रु. ६४.४० लाख**

****